# प्रेस नोट

दि.१९/०७/२०१८

**लोकसेवक नितीन रमेश गर्जे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना २,००,०००/– रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, यातील तक्रारदार यांचे भावजईचे नावे रेशन दुकान असून तक्रारदार व त्यांची भावजई दोघे रेशन दुकानाचे कामकाज पाहतात. यातील तक्रारदार यांचे रेशन दुकानाकरीता माल वाहतुकीसाठी असलेला टेम्पो लोकसेवक नितीन रमेश गर्जे, पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी पकडला होता. सदर टेम्पो लोकसेवक नितीन रमेश गर्जे यांनी सोडून दिला होता. तक्रारदार यांचे रेशन दुकानावर कारवाई न करण्यासाठी व टेम्पोवर कारवाई न केल्याच्या मोबदल्यात मासिक हप्ता ५०,०००/– रुपये प्रमाणे मागील पासुन आत्ता पर्यंतचे एकुण ८,००,०००/– रुपयांची लाचेची मागणी पंच साक्षिदारासमक्ष करुन त्यापैकी २,००,०००/– रुपये लाचेची रक्कम आज दिनांक १९/०७/२०१८ रोजी आरोपी लोकसेवक नितीन रमेश गर्जे, पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील चर्चच्या गेट समोरील रोडवर पंच साक्षिदारासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर |
| फोन नंबर | ०२४१–२४२३६७७, मोबाईल नंबर ७२७६०६१११३ |
| टोल फ्रि नंबर | १०६४ |

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर